दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | सोमवार दि.११ मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २४९ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Monday 11 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 249 | Pages 4 | Rate 4 Rs


## मुंबईच्या राजकारणात 'ठाणे पॅटर्न'ची एन्ट्री

**मुंबई**–ठाणे जिल्ह्यात शिंदेसेनेचे निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित करणारे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आता मुंबईच्या रणांगणात मुख्य समन्वयक' म्हणून उतरले आहेत. १६ मे २०२६ पासून सुरू होणाऱ्या या दोन महिन्यांच्या विशेष मोहिमेत मुंबईचा रिमोट कंट्रोल' त्यांच्या हाती असणार आहे. दरम्यान, खासदार श्रीकांत शिंदे २२ जिल्ह्यांतील ७० विधानसभा मतदारसंघांत जाऊन थेट कार्यकर्त्यांशी संवाद साधतील.राजकीय वर्तुळात याला ठाणे मॉडेल'चे मुंबईत आगमन मानले जात आहे. राहुल शेवाळे (उत्तर व दक्षिण मध्य), नीलेश राणे (दक्षिण व ईशान्य) आणि योगेश कदम (उत्तर व उत्तर-पश्चिम) यासारख्या आक्रमक नेत्यांची फळी मैदानात उतरवली असली, तरी अंतिम निर्णयाची दोरी श्रीकांत शिंदेंच्या हाती असेल. मुंबईतील विखुरलेली पक्षसंघटना सांधणे आणि अंतर्गत गटबाजी मोडीत काढणे, हा या रणनीतीचा मुख्य भाग आहे. ही केवळ संघटनात्मक नियुक्ती नसून, भविष्यातील नेतृत्वाच्या दृष्टीने टाकलेले मोठे पाऊल आहे.

# फडणवीस सरकारचा भूमिपुत्रांना मोठा दिलासा

## जिल्हा बँक भरतीत ७० टक्के जागा स्थानिकांसाठी राखीव; ग्रामीण तरुणांसाठी संधी

**राज्यातील भूमिपुत्रांसाठी फडणवीस सरकारने मोठा आणि महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील नोकरभरती प्रक्रियेत आता संबंधित जिल्ह्यातील स्थानिक युवकांना मोठे प्राधान्य दिले जाणार आहे. सहकार विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांतील भरतीमध्ये ७० टक्के पदे त्या जिल्ह्यातील मूळ रहिवाशांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. उर्वरित ३० टक्के जागांसाठी इतर जिल्ह्यांतील उमेदवारांना संधी दिली जाणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना मोठा दिलासा मिळाल्याची चर्चा सुरू झाली आहे.**



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना हे नवे नियम लागू करण्यात आले आहेत. ज्या बँका पुढील काळात पदभरतीची जाहिरात प्रसिद्ध करतील, त्यांना या नव्या आदेशांचे पालन करणे बंधनकारक असणार आहे. या निर्णयामुळे स्थानिक युवकांना त्यांच्या जिल्ह्यातच रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. अनेक वर्षांपासून स्थानिक तरुणांना नोकरीत प्राधान्य द्यावे, अशी मागणी विविध स्तरातून केली जात होती. त्यानंतर सरकारने हा निर्णय घेतल्याने ग्रामीण भागात समाधान व्यक्त केले जात आहे.

सरकारच्या या निर्णयामागे स्थानिक परिस्थितीची जाण असलेले कर्मचारी तयार करण्याचा उद्देश असल्याचे सांगितले जात आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे कामकाज प्रामुख्याने ग्रामीण भागाशी आणि शेतकऱ्यांशी संबंधित असते. त्यामुळे त्या भागातील बोलीभाषा, सामाजिक रचना, शेतीची परिस्थिती आणि स्थानिक अडचणी समजणारे कर्मचारी बँकांमध्ये असणे आवश्यक मानले जाते. स्थानिक युवकांना संधी दिल्यास ग्राहकांशी संवाद अधिक प्रभावी होईल आणि बँकांची सेवा अधिक लोकाभिमुख होईल, असा विश्वास सहकार विभागाने व्यक्त केला आहे.राज्यात कार्यरत असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग मानल्या जातात. या बँका शेतकरी, विकास संस्था आणि ग्रामीण सहकार व्यवस्थेशी थेट जोडलेल्या आहेत. गावपातळीवरील अनेक विकास संस्थांचे आर्थिक व्यवहार या बँकांवर अवलंबून असतात. त्यामुळे बँकांमध्ये स्थानिक युवकांची नियुक्ती झाल्यास कामकाज अधिक गतिमान आणि प्रभावी होईल, असा सरकारचा दावा आहे. तसेच शेतकऱ्यांना कर्जपुरवठा, आर्थिक सेवा आणि इतर योजनांचा लाभ देताना येणाऱ्या अडचणीही कमी होतील, असेही सांगितले जात आहे.या निर्णयामुळे ग्रामीण भागातील बेरोजगार युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक तरुण उच्चशिक्षण पूर्ण करूनही रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत. जिल्हा बँकांमध्ये स्थानिकांना प्राधान्य मिळणार असल्याने त्यांना स्वतःच्या जिल्ह्यात रोजगार मिळण्याची संधी वाढणार आहे. यामुळे रोजगारासाठी मोठ्या शहरांकडे होणारे स्थलांतरही काही प्रमाणात कमी होऊ शकते, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती वाढवण्यासाठी सरकारचा हा निर्णय महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

### निर्णय इतर संस्थांमध्येही लागू व्हावा

**दरम्यान, फडणवीस सरकारच्या या निर्णयाचे विविध स्तरांतून स्वागत होत आहे. ग्रामीण भागातील तरुण, सहकारी क्षेत्रातील कार्यकर्ते आणि अनेक सामाजिक संघटनांनी या निर्णयाला सकारात्मक पाऊल म्हटले आहे. स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्याचा निर्णय भविष्यात इतर संस्थांमध्येही लागू व्हावा, अशी मागणी आता पुढे येऊ लागली आहे.**




# उप-वर्गीकरणाविरोधात बीडमध्ये आंबेडकरवादी समाजाचा एल्गार

## संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी एकजुट व्हा-विजय साळवे

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य आंबेडकरवादी मोर्चासाठी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन रिपब्लिकन सेनेचे मराठवाडा समन्वयक विजय दादा साळवे यांनी केले आहे. आरक्षणातील अ, ब, क, ड उप-वर्गीकरणाच्या मुद्द्यावर समाजामध्ये व्यापक जनजागृती निर्माण करून संविधानिक हक्क, सामाजिक न्याय आणि समतेच्या संरक्षणासाठी हा मोर्चा निर्णायक ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



यावेळी बोलताना विजय साळवे म्हणाले की, ही लढाई कोणत्याही समाजाच्या विरोधात नसून सरकारच्या धोरणांविरोधात आहे. भारतीय संविधानाने दिलेले हक्क अबाधित ठेवण्यासाठी आणि सामाजिक समतेचे रक्षण करण्यासाठी सर्व आंबेडकरवादी समाजाने एकत्र येण्याची गरज आहे. त्यांनी आंबेडकरवादी मातंग समाज आणि बौद्ध समाज हे पूर्वीपासून एकजुटीने संघर्ष करत आले असून भविष्यातही ही एकता अधिक मजबूत राहील, असा विश्वास व्यक्त केला.


आरक्षणातील उप-वर्गीकरण म्हणजेच अ, ब, क, ड वर्गीकरण हा विषय सध्या राज्यभर चर्चेचा केंद्रबिंदू ठरत असून, यामुळे अनुसूचित जाती समाजामध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. समाजातील अनेक संघटनांनी या उप-वर्गीकरणामुळे आरक्षणाच्या मूळ उद्देशालाच धक्का बसू शकतो, अशी भूमिका घेतली आहे. सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला बाधा पोहोचविणारे कोणतेही धोरण स्वीकारले जाणार नाही, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

उप-वर्गीकरणाचे दूरगामी परिणाम सर्व समाजघटकांसाठी घातक ठरू शकतात. त्यामुळे सरकारने याबाबत समाजातील सर्व घटकांशी चर्चा करूनच निर्णय घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली. तसेच समाजातील युवक, महिला, विद्यार्थी आणि विविध संघटनांनी एकत्र येऊन संविधान बचाव आणि हक्क संरक्षणासाठी संघर्ष अधिक तीव्र करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.बीड येथे होणाऱ्या या भव्य मोर्चामध्ये आंबेडकरवादी, बौद्ध, मातंग तसेच सामाजिक न्यायावर विश्वास ठेवणाऱ्या सर्व समाजबांधवांनी तन, मन आणि धनाने सहभागी व्हावे, असे आवाहन विजय साळवे यांनी केले आहे.

# शेतात आग लागून कडबा जळून खाक, शेतकऱ्याचे नुकसान

दैनिक वादळ वार्ता
**जालना । असलम कुरेशी**


शेती करताना शेतकऱ्यांचे कितीही पूर्वनियोजन असले तरी शेतात या ना त्या कारणाने नुकसान होतेच. कारण आपत्कालीन संकटे कोणत्या स्वरूपात शेतकऱ्यांवर ओढवेल हे सांगता येणं शक्य नाही. अशीच एक घटना घनसावंगी तालुक्यातील रांजणी शिवारात घडली. रांजणी शिवारातील शेतात अचानक आग लागून शेतकऱ्याचे कडब्यासह शेतकी अवजार जळून खाक झाले असून शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले.



घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील शेतकरी सय्यद रशीद अली यांच्या गट क्रमांक २९४ मधील शेतामध्ये रविवारी अचानक कडब्याच्या गंजीला आग लागल्याची भीषण घटना घडली आहे. कडब्याच्या गंजीला लागलेल्या आगीत २ हजार २०० कडब्यासह भुस, पत्रे, औत, सरपन, लोखंडी व प्लास्टीकचे पाईप जळून मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. या आगीत जवळपास २ हजार पेक्षा जास्त कडबा पेंडी व शेती उपयोगी साहित्य जळून खाक झाल्याची घटना घडली आहे. सय्यद रशीद अली यांनी त्यांच्या कडब्याची वळई करुन ठेवली होती. मात्र अचानक या कडब्याने पेट घेतला. शिवाय वारा असल्याने आग आटोक्यात येणं शक्य नव्हतं. त्यामुळे आग वाढतच गेली.

आग लागल्याची माहिती समजताच गावकऱ्यांसह इतर नागरिक आग विझविण्यासाठी घटनास्थळी पोहचले. आग विझविण्याचा बराच प्रयत्न केला गेला. मात्र, आगीचा भडका अधिकच वाढला व शेतात लागलेली आग विझविणे शक्य झाले नाही. पाहता पाहता या आगीत सुमारे २ हजार पेक्षा जास्त कडबा पेंडी व शेती उपयोगी साहित्य जळून खाक झाले. या आगीत सय्यद रशीद अली यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शासनाने नुकसान भरपाई देण्याची मागणी होत आहे.

# केजमध्ये रंगणार क्रिकेटचा थरार,आमदार चषक टेनिस बॉल स्पर्धेचे आयोजन; विजेत्याला मिळणार टीव्हीएस रायडर गाडी



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज मतदारसंघात शहरी व ग्रामीण भागातील क्रीडा प्रेमींसाठी आनंदाची बातमी आहे. युवा नेते अक्षयभैय्या मुंदडा यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून,अक्षय मुंदडा मित्र मंडळ व नंदकिशोर मुंदडा युवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य खुल्या 'आमदार चषक' टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.या स्पर्धेतील प्रथम पारितोषिक म्हणून आकर्षक टीव्हीएस रायडर (TVS Raider) मोटारसायकल देण्यात येणार असल्याची माहिती मुख्य आयोजक सुनील घोळवे,शरद इंगळे,महादेव सुर्यवंशी, राहुल गदळे,खदीर कुरेशी,शिवाजी पाटील, अनिरुद्ध शिंदे,सुरेश नांदे यांनी दिली आहे.

**मैदान आणि गटवारी**

ही स्पर्धा केज येथील पंचायत समितीच्या मैदानावर रंगणार आहे. स्पर्धेचे स्वरूप अत्यंत चुरशीचे असून, यामध्ये 'शहरी' आणि 'ग्रामीण' अशा दोन स्वतंत्र गटांत सामने खेळवले जातील. प्रवेश फी २९९९ रु राहील.दोन्ही गटांतील अव्वल ठरणाऱ्या संघांमध्ये २३ मे रोजी महाअंतिम सामना (Grand Finale) रंगणार आहे.

**पारितोषिकांचा वर्षाव**

स्पर्धेतील विजेत्या संघांवर बक्षिसांची लयलूट होणार आहे.

प्रथम पारितोषिक: टीव्हीएस रायडर (TVS Raider) बाईक,

द्वितीय पारितोषिक : ५१,००० रुपये रोख.

वैयक्तिक बक्षिसे : मॅन ऑफ द सिरीज,बेस्ट बॅट्समन,बेस्ट बॉलर, बेस्ट ऑल राऊंडर आणि बेस्ट विकेटकीपर या श्रेणीतही विशेष गौरव केला जाणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन: १३ मे २०२६ अंतिम सामना व बक्षीस वितरण: २३ मे २०२६

युवा नेते अक्षयभैय्या मुंदडा यांच्या वाढदिवसानिमित्त केजमधील खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळावे,या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन केले आहे.जास्तीत जास्त संघानी या स्पर्धेत सहभागी होऊन,शहर आणि ग्रामीण भागातील खेळाडूंनी आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करावे.- सुनील घोळवे (आयोजक)

**सहभागाचे आवाहन**

या भव्य स्पर्धेत जास्तीत जास्त संघांनी सहभाग नोंदवावा,असे आवाहन संयोजक प्रकाश मुंडे, किरण सारूक सर, हाफी साहेब इनामदार आणि प्रमोद मस्के यांनी केले आहे.या स्पर्धेमुळे केज परिसरातील क्रिकेट प्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण असून,सुनील घोळवे यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.




# संपादकीय

## ‘एल निनो’ चा खेळ



‘एल निनो’ हा शब्द आपल्या कानावर हमखास पडतो; कधी भारतातील नैऋत्य मान्सूनसंदर्भातील चर्चांमध्ये, तर कधी जागतिक हवामान बदलाच्या मोठ्या चित्रात. भारतीय उपखंडासाठी नैऋत्य मान्सून हा केवळ ऋतू नसून जीवनरेखा आहे, कारण वर्षभरात पडणाऱ्या पावसाच्या ७५ % हून अधिक पाऊस हा केवळ नैऋत्य मान्सूनमुळे पडतो. त्यामुळे त्यावर परिणाम करणाऱ्या कोणत्याही घटनेकडे लक्ष जाणं स्वाभाविकच आहे. अलीकडच्या चर्चांमध्ये आता ‘सुपर ‘एल निनो’ किंवा काही माध्यमांत ‘गॉडझिला एल निनो’ असा उल्लेख अधिक ठळकपणे ऐकू येत आहे, पण ‘एल निनो’ परिणाम नेमका काय असतो? तो भारतासह जगावर कसा परिणाम करतो? खरोखरच या वर्षी ‘सुपर एल निनो’ बनू शकतो का? आणि तसं झाल्यास जागतिक हवामानावर काय परिणाम होतील? या सर्व प्रश्नांची उत्तरं जाणून घेणं आवश्यक आहे.‘एल निनो’ हा शब्द स्पॅनिश भाषेतून आलेला आहे आणि त्याचा थेट संबंध प्रशांत महासागराशी आहे. पेरू (दक्षिण अमेरिका) देशातील मच्छिमारांनी हा शब्द प्रथम वापरला होता. ख्रिसमसच्या काळात पेरू जवळील प्रशांत महासागरातील पाण्याचं तापमान वाढलं की माशांची संख्या अचानक कमी होते, असं त्यांच्या लक्षात आले. त्यांनी याला ‘एल निनो’ म्हणजे ‘ख्रिस्त बालक’ असे नाव दिले. सुरुवातीला ही घटना फक्त स्थानिक समुद्री बदल म्हणून पाहिली जात होती, पण पुढे वैज्ञानिक निरीक्षणातून लक्षात आलं की ही घटना जागतिक हवामानाशी जोडलेली आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिल्यास ‘एल निनो’ ही प्रशांत महासागरातील समुद्रपृष्ठ तापमानातील असामान्य वाढ आहे. विशेषतः मध्य आणि पूर्व विषुववृत्तीय (equatorial) प्रशांत महासागरातील पाणी नेहमीपेक्षा जास्त गरम होते, आणि हीच अनियमितता जगातील हवामानात मोठे बदल घडवते. साधारणपणे ‘एल निनो’ची ही प्रक्रिया दर दोन ते सात वर्षांनी पुन्हा दिसून येते.‘एल निनो’ कसा तयार होतो हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. सामान्य परिस्थितीत ‘ट्रेड विंड्स’ म्हणजेच व्यापारी वारे पूर्वेकडून पश्चिमेकडे (दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्यापासून इंडोनेशियाकडे) वाहतात. हे वारे समुद्राच्या पृष्ठभागावरील गरम पाणी पश्चिम प्रशांत महासागरातील भागात ढकलतात. त्यामुळे इंडोनेशिया आणि आसपासच्या भागात गरम पाण्याचा मोठा साठा तयार होतो, पण काही वेळा हे व्यापारी वारे कमकुवत होतात किंवा दिशा बदलतात. इंडोनेशियाजवळून पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहणारे वारे सुरू झाले की हे साठलेले गरम पाणी पूर्व प्रशांत महासागराच्या दिशेने सरकते. यामुळे पूर्वेकडील समुद्रपृष्ठ तापमान अचानक वाढते, आणि ‘एल निनो’चा जन्म होतो. सामान्यपणे एप्रिलनंतर एल निनो निर्माण होतो आणि डिसेंबर महिन्याच्या आसपास त्याची तीव्रता सर्वांत अधिक असते. ‘एल निनो’ किती तीव्र होईल हे प्रशांत महासागरात किती उष्णता आहे आणि वाऱ्यांची स्थिती काय आहे यावर अवलंबून असते.या उष्ण पाण्यामुळे तिथे मोठ्या प्रमाणात वाफ आणि ढग तयार होतात. परिणामी पूर्व प्रशांत महासागरात मुसळधार पाऊस पडतो आणि वादळांमध्ये वाढ होते. ही बदललेली उष्णता आणि दाब प्रणाली जागतिक हवामान चक्र बदलते. ‘एल निनो’च्या काळात वातावरणात मोठ्या प्रमाणात उष्णता सोडली जाते, ज्यामुळे जागतिक सरासरी तापमान वाढते. २०२३ मध्ये ‘एल निनो’ निर्माण झाला आणि त्यानंतरच्या काळात जागतिक तापमानात मोठी वाढ नोंदवली गेली. २०२४ हे आतापर्यंतचे सर्वांत उष्ण वर्ष ठरले. मागील तीन वर्षे (२०२३ ते २०२५) ही नोंदवलेल्या इतिहासातील सर्वांत उष्ण तीन वर्षे ठरली आहेत. ‘एल निनो’मुळे काही भागांत तीव्र दुष्काळ पडतो (उदा. ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया), तर काही ठिकाणी अतिवृष्टी आणि पूरस्थिती निर्माण होते (उदा. दक्षिण अमेरिका). तसेच उष्णतेच्या लाटा, वणवे, आणि उष्णकटिबंधीय वादळांच्या पॅटर्नमध्येही बदल दिसून येतात. अटलांटिक महासागरावर तयार होणाऱ्या चक्रीवादळांची संख्या कमी होते. ‘एल निनो’चा नकारात्मक प्रभाव भारताच्या नैऋत्य मान्सूनवर दिसून येतो. महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्येही कमी पाऊस आणि दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. २००२, २००९, २०१५, २०१८ आणि २०२३ या वर्षांमध्ये मान्सून लक्षणीयरीत्या कमजोर राहिला आणि अनेक भागांत पाणीटंचाई निर्माण झाली. हे सर्वच ‘एल निनो’ची वर्षे होती!‘एल निनो’ मोजण्यासाठी वैज्ञानिक मध्य आणि पूर्व प्रशांत महासागरातील समुद्रपृष्ठ तापमानातील बदल पाहतात आणि त्याची तुलना दीर्घकालीन सरासरीशी करतात. जेव्हा हे तापमान साधारण २ अंश से. किंवा त्याहून अधिक वाढते, तेव्हा काही वेळा त्याला ‘सुपर एल निनो’ असे म्हटले जाते. मात्र हे अधिकृत वैज्ञानिक वर्गीकरण नाही, तर लोकप्रिय माध्यमांमध्ये वापरला जाणारा शब्द आहे. १९५० ते २०२५ या काळात १९५७, १९६५, १९७२, १९८२, १९९१, १९९७ आणि २०१५ या वर्षांमध्ये असे सुपर ‘एल निनो’ नोंदवले गेले आहेत. यातील विशेष उदाहरण म्हणजे १९९७ चा ‘एल निनो’. त्या वेळी असा अंदाज होता की भारतात मान्सून अत्यंत कमजोर राहील. मात्र प्रत्यक्षात देशभरात सरासरीपेक्षा सुमारे दोन टक्के अधिक पाऊस झाला. या घटनेनंतर वैज्ञानिकांना लक्षात आलं की ‘एल निनो’चा प्रभाव एकटाच निर्णायक नसतो; त्यावर भारतीय महासागरातील (Indian Ocean) परिस्थितीही परिणाम करते.

सध्या ‘एल निनो’ची स्थिती विकसित होत आहे आणि ती मागील घटनांच्या तुलनेत अधिक वेगाने तयार होत असल्याचे दिसते. विविध जागतिक हवामान संस्थांच्या मॉडेल्सनुसार पुढील काही महिन्यांत हा ‘एल निनो’ अधिक मजबूत होईल, आणि काही परिस्थितींमध्ये तो ‘सुपर’ स्तर गाठू शकतो. सध्या प्रशांत महासागराच्या उप–पृष्ठभागात मोठ्या प्रमाणात उष्णता साठलेली आहे, जी या प्रक्रियेला अधिक बळ देत आहे. जून ते जुलै काळापासून ‘एल निनो’ चा प्रभाव दिसून येईल अशी सध्याची स्थिती आहे. यामुळे यंदा महाराष्ट्रासह भारतात नैऋत्य मान्सूनचा एकूण पाऊस सरासरीपेक्षा कमी राहील, असा अंदाज आहे. तसेच जागतिक स्तरावर या वर्षाच्या उत्तरार्धात आणि २०२७ मध्ये सरासरी तापमानात आणखी वाढ होऊ शकते. त्यामुळे हवामानातील टोकाचे बदल अधिक तीव्र होऊ शकतात.

# पनवेल कृषी उत्पन्न बाजार समिती भ्रष्टाचाराचे कुरण

## अधिकारी, कर्मचारी यांच्या कोट्यवधी रुपयांच्या बेहिशोबी मालमत्तेची चौकशीची व्यापारी, शेतकऱ्यांची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यामधील श्रीमंत यार्ड म्हणून प्रसिद्ध व नावलौकिक असलेले पनवेल कृषी उत्पन्न बाजार समिती ही भ्रष्टाचाराचे महाकुरण असल्याची जोरदार चर्चा आहे. येथे शेतकऱ्यांची माल आणि पावतीचा माध्यमातून फसवणूक करून दिवसाला लाखो रुपये लाटले जात आहेत. अ दर्जा असलेल्या या बाजार समितीत कोट्यावधींची व्यावसायिक उलाढाल होत आहे. याचाच फायदा येथील संचालक मंडळ, अधिकारी आणि कर्मचारी वर्ग यांनी घेऊन बाजार समितीला भ्रष्टाचाराचे महाकुरण बनविले आहे. येथील संचालक मंडळ, चतुर्थश्रेणीतील कर्मचाऱ्यांची कोट्यवधीची बेहिशोबी मालमत्ता असल्याचे दिसून येते. या सर्वांची महाराष्ट शासनाने सखोल चौकशी करावी. तसेच येथील संचालक मंडळ अधिकारी वर्ग आणि कर्मचारी वर्ग यांची एऊ मार्फत चौकशी करण्याची मागणी व्यापारी व शेतकरी वर्ग करीत आहेत.पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचा कारभार महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन ( विकास व विनियमन ) अधिनियम १९६३ अंतर्गत चालतो. मात्र कायद्यातील सर्व नियमांना बगल देऊन शासनाच्या नियंत्रकांना आर्थिक साटेलोटे, बाई आणि बाटली देवून नियमबाह्य कारभार चालविला जातो. या बाजार समितीत कोणताही कालबाह्य विकास आराखडा तयार नाही. मोठ्या प्रमाणात व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची लूट केली जाते याला सर्वस्वी बाजार समिती जबाबदार असायची संतप्त प्रतिक्रिया शेतकरी देत आहेत बाजार समिती भष्ट्राचाराने बरबटली असल्याने कोणतेही नियंत्रण नाही. समितीच्या कारभारात मोठ्या प्रमाणात अनियमितता दिसून येते.

**पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जागेवर आलिशान हॉटेल, दुकाने**

पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी ४२ एकर जागा देण्यात आल्याचे समजते. त्यातील ४ एकर जागेवर बाजार बसविण्यात आला आहे. बाकी जागेवर मोठ्या हस्ती संचालकांनी अनधिकृत आलिशान हॉटेल, लॉजिंग बोर्डिंग,दुकाने उभारली आहेत. या अनधिकृत जागेच्या विक्रीत करोडो रुपयांचा भष्ट्राचार झाला आहे.

**संचालक मंडळाचे अनधिकृत गाळे**

या बाजार समितीत मध्ये जेथे मोकळी जागा मिळेल तेथे संचालक मंडळाने अनधिकृत गाळे उभारले आहेत. यामध्ये अनेक संचालकांचे अनधिकृत गाळे आहेत. त्याला कायद्यानुसार कोणतीही मान्यता नाही. या बाजार समितीत कायदेशीर विकास आराखड्याला मान्यता नसल्याचे सत्य उघडकीस येत आहे.



संचालक मंडळाच्या सभेपूर्वी संचालकांना दरमाह विशेष पॅकेज व मौल्यवान भेट वस्तू आणि उच्च दर्जाचे साधने, साहित्य सभेपूर्वी त्यांच्या निवासस्थानी पोहच होत आहेत.

**महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन अधिकाऱ्यांना २५–३० लाख, बाई आणि बाटली**

येथे तपासणीसाठी येणाऱ्या पणन विभागाच्या विशेष तपासणी अधिकारी याचे हॉलिडे पॅकेज तयार असते. त्यात २५–३० लाख बाई आणि बाटलीची व्यवस्था केली जाते. या समितीच्या कारभाराबाबत तक्रारी अलिबाबाच्या गुन्हेत गायब होतात. त्यामुळे येथे अनियमितता मोठ्या प्रमाणात होत आहे.

**मीटर रूमची विक्री, प्रवेश द्वाराजवळील कार्यालय गायब**

बाजार समितीतील व्यापारी वर्गासाठी बांधण्यात आलेला मीटर रूम बाजार समितीने विक्रीला काढला. मार्केट यार्डच्या मुख्य प्रवेश द्वारावर पावती फाडण्यासाठी असलेले दोन कार्यालय अनधिकृतपणे विक्रीला काढले. त्याचा कार्यालयाच्या लागून मार्केटसाठी असलेला रस्तावर अनधिकृतपणे रूम बांधून ते ४५ लाखांना विकले.

**पाण्याच्या टाकीच्या जागेवर रूम बांधले**

येथील बाजारात येणाऱ्या व्यापारी, नागरिक यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती त्या जागेवर अनधिकृत रूम बांधून त्यांची मोठ्या रक्कमेने विक्री करण्यात आली. या मार्केट मध्ये पाण्याची व्यवस्था नसल्याने नागरिकांना पाण्यासाठी दुकाने गाठावी लागत आहेत.

**परप्रांतीय व्यापारी तुपाशी! स्थानिक शेतकरी उपाशी!!**

पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीतील बहुतांशी गाळे हे परप्रांतीय व्यापारी यांना मोक्याच्या जागी देण्यात आले आहेत. परप्रांतीयांची मोठ्या प्रमाणावर चलती असून संचालक मंडळाला खुष करण्यासाठी त्यांच्याकडून भेट वस्तु दिल्या जातात. मात्र स्थानिक शेतकऱ्यांना मोक्याच्या गाळ्यांच्या जागा न मिळाल्याने त्यांचे गाळे बंद पडून त्याच्यावर उपास मारीची पाळी आली आहे. स्थानिक भूमीपुत्र व शेतकरी उपाशी असल्याचे चित्र दिसत आहे.

# देवरुखमध्ये ‘ओमेगा गार्डन हॉल’चे उद्घाटन!

## कापडी कुटुंबीयांनी कष्टातून उभे केले हॉटेल–केटरिंग क्षेत्रातील साम्राज्य–आ.भास्कर जाधव

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

चिपळूणमधील कापडी कुटुंबीयांनी अत्यंत कष्ट, प्रामाणिकपणा आणि उत्तम व्यवस्थापनाच्या जोरावर हॉटेल व केटरिंग व्यवसायात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. खाद्यपदार्थांची उत्कृष्ट चव, ग्राहकांशी आपुलकीचे संबंध आणि दर्जेदार सेवा यामुळे 'ओमेगा' हा ब्रँड संपूर्ण जिल्ह्यात प्रसिद्ध झाला आहे, असे गौरवोद्गार माजी मंत्री तथा गुहागर विधानसभा मतदार संघाचे आमदार भास्करशेठ जाधव यांनी काढले.देवरुख येथील सावरकर चौकात उभारण्यात आलेल्या ‘ओमेगा गार्डन हॉल’च्या उद्घाटनप्रसंगी सोमवारी ते बोलत होते.चिपळूणमधील कापडी कुटुंबीय गेली अनेक वर्षे हॉटेल आणि केटरिंग व्यवसायात कार्यरत आहेत. 'ओमेगा हॉटेल', 'ओमेगा इन' यांसारख्या हॉटेलच्या माध्यमातून त्यांनी ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. श्री. कल्पेश कापडी यांनीही या व्यवसायात अनेक वर्षे काम करताना स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांनी चार वर्षे माटे– भोजने हॉलचे व्यवस्थापन व केटरिंग सांभाळले होते. आता संतोष उर्फ बंड्या जाधव यांच्या जागेत भाडेतत्त्वावर अत्याधुनिक ‘ओमेगा गार्डन हॉल’ची उभारणी केली आहे.या उद्घाटन सोहळ्यास चिपळूण–संगमेश्वर विधानसभा मतदार संघाचे आमदार शेखर निकम, माजी मंत्री तथा माजी आमदार रवींद्र माने, माजी उपनगराध्यक्ष अभिजित शेट्ये यांच्यासह विविध क्षेत्रांतील



मान्यवर उपस्थित होते. तसेच चिपळूणचे नगरसेवक अजय भालेकर, उमा देसाई, देवरुखचे नगरसेवक बाळा कामेरकर, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे तालुकाप्रमुख बंड्या बोरूरकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयंद्रथ खताते, शिक्षक नेते बबन बांडागळे, तालुकाध्यक्ष नितीन ठसाळे, चिपळूण अर्बन बँकेचे अध्यक्ष मोहनशेठ मिरगल, संचालक निहार गुडेकर, खेर्डीचे सरपंच दशरथ दाभोळकर, सतीशअप्पा खेडेकर, बाळू ढवळे, मंगेश माटे, दीपक खेडेकर, राजू वणकुंद्रे, प्रदीप पाटणे, प्रफुल्ल भुवड, पंकज पुसाळकर, नितीन भोसले, पंचायत समिती सदस्य मंगेश बांडागळे, रामू पंदेरे, अनंत जाधव, वैश्य समाज संघटनेचे युवक जिल्हाध्यक्ष श्रीनाथ खेडेकर, रोहन चौधरी, प्राजेश खेडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.मान्यवरांचे स्वागत कल्पेश कापडी, मिलिंद कापडी, अनघा कापडी, प्रथमेश कापडी, साजन कापडी, बिपिन कापडी आणि बापू कापडी यांनी केले.यावेळी आमदार शेखर निकम म्हणाले की, देवरुखामध्ये ७०० आसन क्षमता असलेला, रत्नागिरी–संगमेश्वर या दोन्ही भागांसाठी अत्यंत सोयीच्या ठिकाणी आणि सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात सुरू झालेला ‘ओमेगा गार्डन हॉल’ हा निश्चितच कौतुकास्पद उपक्रम आहे. या सुसज्ज व देखण्या हॉलमुळे देवरुख शहराच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.माजी मंत्री रवींद्र माने यांनी जुन्या आठवणींना उजाळा देताना सांगितले की, देवरुख शहराचा विस्तार आणि लोकसंख्या वाढत गेल्याने मोठ्या हॉलची गरज निर्माण झाली होती. पंतजोशी हॉलनंतर माटे– भोजने हॉल आणि मराठा भवन उभे राहिले; मात्र वाढत्या मागणीमुळे आणखी सुविधेची आवश्यकता होती. ‘ओमेगा गार्डन हॉल’मुळे देवरुख, संगमेश्वर व परिसरातील नागरिकांची मोठी गरज पूर्ण झाली आहे.माजी उपनगराध्यक्ष अभिजित शेट्ये यांनी सांगितले की, कल्पेश कापडी यांनी चार वर्षे माटे– भोजने हॉलचे व्यवस्थापन करताना आपल्या हातच्या चवीने, उत्तम नियोजनाने आणि आपुलकीच्या स्वभावाने देवरुखवासीयांची मने जिंकली आहेत. भविष्यात ‘ओमेगा गार्डन हॉल’ नागरिकांच्या सर्व गरजा पूर्ण करेल आणि कल्पेश कापडी यांना या व्यवसायात आणखी यश मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमात हॉलसाठी जागा उपलब्ध करून देणारे संतोष उर्फ बंड्या जाधव, हॉलची उभारणी करणारे ठेकेदार भरत राऊत आणि आर्किटेक्ट राज राऊत यांचा आमदार भास्कर जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच कल्पेश कापडी यांचाही सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.कार्यक्रमाला देवरुख, संगमेश्वर, चिपळूण परिसरातील व्यावसायिक, नागरिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश बांडागळे यांनी केले.

# ठाणे पालिकेतील ६४ सफाई कर्मचाऱ्यांचे वारस नोकरीत सामाविष्ठ;महापौरांच्या हस्ते नियुक्तीपत्रे प्रदान



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

ठाणे महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसातत्त्वावर महापालिकेच्या सेवेत सामावून घेण्याबाबत तसेच त्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सूचना दिल्या होत्या. त्यानुसार महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी प्रशासनासोबत सातत्याने पाठपुरावा करून संबंधित प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने सन मे २०२४ ते ऑगस्ट २०२४ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या ६४ वारसांना महापालिकेच्या सेवेत सामावून घेण्यासाठी नियुक्तीपत्रे तयार करण्यात आली आहेत. यापैकी प्रतिनिधीक स्वरूपात १० जणांना महापौर दालनात महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

सफाई कर्मचाऱ्यांचा वारसा हक्क आणि अन्य प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी महापौरांनी प्रशासनासोबत विशेष बैठक घेऊन आवश्यक सूचना दिल्या होत्या. त्यानुसार प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत नियुक्ती प्रक्रिया पूर्ण केली. आज प्रातिनिधीक स्वरुपात १० जणांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली असून उर्वरित जणांना प्रशासनामार्फत नियुक्तीपत्राचे वाटप करण्यात येणार आहे.या निर्णयामुळे सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्यांमध्ये तसेच त्यांच्या वारसांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, विरोधी पक्षनेते अशरफ शानू पठाण, शिवसेना गटनेते पवन कदम, महापालिका आयुक्त सौरभ राव तसेच प्रशासनातील अधिकाऱ्यांचे आभार व्यक्त केले.

# अर्धापूर महसूल मंडळात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**अर्धापूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने तहसिल कार्यालय,अर्धापूर अंतर्गत अर्धापूर महसूल मंडळाच्या वतीने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबिर येथील तहसिल कार्यालयाच्या प्रांगणात संपन्न झाले.

यावेळी प्रियंका पवार - कर्डिले उपजिल्हाधिकारी भूसंपादन तथा समन्वय अधिकारी,डॉ.सचिन खल्लाळ , उपविभागीय अधिकारी नांदेड,रेणुकादास देवणीकर तहसिलदार अर्धापूर यांच्यासह पंचायत समिती,कृषी,आरोग्य,सहकार, पुरवठा,महिला व बालकल्याण,समाजकल्याण, निवडणूक,दुय्यम निबंधक,भूमी अभिलेख,महावितरण,पशुसंवर्धन इ.विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील विविध सुधारणांबाबत तसेच मुखमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना,डिजिटल ७/१२ च्या वैधतेबाबत, भोगवटदार वर्ग - २ ची जमीन वर्ग - १ करणे बाबतच्या तरतुदी बाबत सखोल मार्गदर्शन तहसीलदार श्री रेणुकादास देवणीकर यांनी केले. समन्वय अधिकारी प्रियंका पवार यांनी यावेळी सर्व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांनी दैनंदिन कामकाज समन्वयाने पार पाडावे व आपल्या विभागाशी संबंधित नसलेल्या विषया संबंधी देखील शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांचे समाधान करावे अशी सूचना केली तसेच जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी समाधान शिबिराच्या माध्यमातून आपल्या समस्या सोडवून घ्याव्यात असे आवाहन केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विशेष सहाय योजनेतील ११ लाभार्थी यांना लाभ मंजुरी आदेश,मंडळातील एकूण ३२ प्रलंबित फेरफार निकाली काढण्यात आले,जिवंत ७/१२ मोहीम अंतर्गत ८८ सातबारा व होल्डिंग,विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे ५१ दाखले, ७० शिधापत्रिका,मोजणी नकाशा १,जन्म - मृत्यू प्रमाणपत्र ४०,नगर पंचायतीचे नमुना नंबर ४३,विवाह प्रमाणपत्र २,नगर पंचायतीचे वतीने प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत १६ लाभार्थी यांना बांधकाम परवाने, इ .वाटप करण्यात आले.तसेच याठिकाणी एक खिडकी योजने मध्ये विविध विभागाशी संबंधित ९ अर्ज,**चाभरा सज्जा अंतर्गत शिधापत्रिके बाबत हदगाव पुरवठा विभागाशी संबंधित एकूण २१० अर्ज स्वीकारण्यात येऊन ते हदगाव येथे वर्ग करण्यात आले**

शेतकरी व विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच विविध योजनांच्या लाभार्थ्यांच्या उस्फुर्त प्रतिसादाने कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री.आर. डी.शिंदे नायब तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी नविन कुमार रेड्डी, ग्राम महसूल अधिकारी किरण मोरे,लक्ष्मण देशमुख, रवि अंभोरे,बालाजी वसमतकर,भास्कर शेळके,प्रेरणा राऊत,सोनाली काकडे महसूल सेवक सुजाता गंगातिरे,दीक्षा नरवाडे,अंकुश पन्नासे,गोविंद पांचाळ शिपाई ओम भांडवले यांनी परिश्रम घेतले.




# नांदेड येथे बंगाली एकता असोसिएशनच्या वतीने रवींद्रनाथ टागोर यांची जयंती साजरी



**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड । हनुमंत चंदनकर**

नांदेडच्या सराफा मार्केट किल्ला रोड येथे आज दिनांक ९ मे रोजी बंगाली एकता असोसिएशन च्या वतीने रवींद्रनाथ टागोर यांची जयंती साजरी करण्यात आली कार्यक्रमाची सुरुवात रवींद्रनाथ टागोर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून झाली यावेळी सुमित्र, सुमित्रकार, भास्कर, सपन, संजय, अमित, रंजन, शेख मराफत यासह अनेक बंगाली एकता असोशियन सदस्य व नागरिक त्या संख्येने उपस्थित होते.

# केरळ कॉंग्रेस महिला आमदार अप्रतिष्ठा प्रकरण: हा तर समस्त महिलांच्या प्रतिष्ठेचा अपमान, संमतीचा आदर करणे गरजेचे-विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरक**

केरळमध्ये नवनिर्वाचित काँग्रेस महिला आमदार यांना पक्षातील ज्येष्ठ नेते चेरियन फिलिप यांनी सार्वजनिक ठिकाणी, पक्षाच्या कार्यालयात मिठी मारण्याचा प्रयत्न केल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. हा प्रकार अत्यंत निंदनीय, असंस्कृतिक आणि महिलांच्या व्यक्तिगत सीमांचा स्पष्ट भंग करणारा आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया महाराष्ट्र विधानपरिषद उपसभापती व शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केली.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, एका महिला आमदाराला, तिने स्पष्ट नकार दिला असताना, हस्तांदोलनासाठी हात पुढे केला असताना देखील जबरदस्तीने गळ्यात हात टाकून जवळ ओढण्याचा प्रयत्न करणे हे केवळ अनैतिक नाही तर राजकीय क्षेत्रातील महिलांच्या सुरक्षिततेच्या आणि प्रतिष्ठेच्या प्रश्नावर गंभीर आघात आहे. भर रस्त्यात किंवा सार्वजनिक कार्यक्रमात महिलांना अशा प्रकारे स्पर्श करण्याचा प्रयत्न करणे, तिच्या अस्वस्थतेकडे पूर्णपणे दुर्लक्ष करणे हे पुरुषसत्ताक मानसिकतेचे द्योतक आहे. हे चित्रण केरळ काँग्रेसच्या कार्यालयात झाले, जिथे इतर नेते आणि माध्यमे उपस्थित होती, तरीही कोणाला हस्तक्षेप करण्याची गरज वाटली नाही . दोषी व्यक्तीवर शिस्तभंगाची कारवाई करावी आणि महिलांच्या सुरक्षिततेबाबत स्पष्ट धोरण जाहीर करावे.

कॉंग्रेसचे नमो शक्ती वंदन विधेयक विरोधाचा बुरखा केरळच्या घटनेने फाडला आहे.बुंदसे गई वो हैदोस नहीं आती हे कॉंग्रेसने लक्षात ठेवावे व महिलांनीही कॉंग्रेसचा भेसूर लक्षात ठेवावा.

महिलांना समान आदराने वागवा, त्यांच्या सीमांचा आदर करा. हे केवळ कायद्याचे पालन करणे उपयोगाचे नाही तर ही सर्वांचीच नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे, हे सर्वांनी लक्षात ठेवायला हवे असेही डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या.



# पंचशील माध्यमिक विद्यालयाचा ८१ टक्के निकाल


## कु.अंकिता दादासाहेब शेळके ९१.४० टक्के गुण मिळवून शाळेतून प्रथम

**दैनिक वादळ वार्ता**
**हदगाव । प्रतिनिधी**

शहरातील आदर्श विद्यार्जन मंडळ द्वारा संचलित पंचशील माध्यमिक विद्यालयाचा ८१ टक्के निकाल लागला आहे शाळेतून ३८४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी ३११ विद्यार्थी उतीर्ण झाले आहेत.

२९ विद्यार्थी विशेष प्राविण्यत,प्रथम श्रेणीत ८९ तर ११० द्वितीय श्रेणी उत्तीर्ण झाले आहेत.

हदगाव तालुक्यातून दहावीला सर्वात जास्त विद्यार्थी परीक्षेला बसवणारी शाळा म्हणून या शाळेकडे पाहिले जाते.



शाळेतून कु.अंकिता शेळके हिने ९१.४०, कु.श्रुती मनवर ९०.६०, कु.कोमल फरकुंडे ९०.२०,शिंदे ऋषिकेश ८८.८०,कोकरे नैतिक ८८.२०,संजीत गिरबिडे ८७.६०, दिव्या बंमरुळे ८७.४०,कु.गायत्री वाकोडे ८७.२०,कु.भिसे अनुष्का हिने ८७ टक्के गुण मिळवले आहेत.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव सुनील सोनुले सह सर्व संचालक मंडळ,मुख्याध्यापक अनिल दस्तूरकर,इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक श्रीमती वर्षा वानखेडे,प्रशांत पतंगे,अमोल नरवाडे,नारायण काळबांडे व जनार्दन देशमुख यांनी अभिनंदन केले आहे.

# देगलूर तालुका क्रीडा संकुलाच्या विकासकामांना गती ३ कोटींच्या कामांचे आ.अंतापूरकर यांच्या हस्ते भूमिपूजन






**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील क्रीडा सुविधांचा विकास साधण्यासाठी देगलूर येथील तालुका क्रीडा संकुलाच्या विविध विकासकामांसाठी आमदार जितेश अंतापूरकर यांच्या पाठपुराव्यातून तब्बल ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या विकासकामांचे भूमिपूजन आज आमदार जितेश अंतापूरकर यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

या विकासकामांमुळे तालुक्यातील खेळाडूंना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होणार असून ग्रामीण भागातील युवकांच्या क्रीडा गुणवत्तेला चालना मिळणार आहे. यावेळी तहसीलदार भरत सुर्यवंशी, क्रीडा अधिकारी,भाजप नेते पळणीटकर,भाजप शहराध्यक्ष प्रशांत दासरवार,भाजपा सरचिटणीस दिपक संगमकर,भाजपा उत्तर अध्यक्ष शिवकुमार देवाडे ,जिल्हाचिटणीस प्रशांत पा.भोकसखेडकर, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष हाणमंतराव डोपेवार, सरचिटणीस जोरगावार यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान आमदार जितेश अंतापूरकर यांनी क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे सांगितले. तसेच ग्रामीण भागातील खेळाडूंना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे ही आपली प्राथमिकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास क्रीडाप्रेमी युवक, स्थानिक नागरिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# किनवट रेल्वे स्टेशनवर प्रवाशांची हेळसांड

## पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्याची मागणी

**दैनिक वादळ वार्ता**
**किनवट । प्रतिनिधी**

किनवट रेल्वे स्थानकावर
सध्या नुतनीकरण आणि विकासकाम सुरू आहे. मात्र, हे काम प्रवाशांच्या सोयीसाठी नसून त्यांच्या अडचणी वाढवणारे ठरत आहे. स्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळील रस्ता खोदून ठेवण्यात आला तरी कोणत्या दिशेला रस्ता तयार केला आहे. आश्चर्याची बाब म्हणजे, या कामाला पुढे काहीच गती नसून ते पूर्णपणे बंद अवस्थेत आहे. यामुळे रोज ये-जा करणाऱ्या प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः महिला, वृद्ध आणि लहान मुलांना या खोदलेल्या रस्त्यातून चालताना मोठी कसरत करावी लागत आहे. दगड, मातीचे ढिगारे आणि असमतोल मार्गामुळे अपघाताचा धोका वाढला आहे.

रेल्वे स्थानकाच्या मुख्य गेटवर नेहमीच प्रवाशांची मोठी गर्दी असते. मात्र, काम सुरू करताना कंत्राटदाराने कोणताही मार्ग दिशा दिलेला नाही. रेल्वे येण्याच्या वेळीप्रवाशांची धावपळ होते, अशा वेळी एखादी गंभीर दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

कोणत्याही कामाच्या ठिकाणी माहिती फलक लावणे आवश्यक असते. त्यावर कामाचे स्वरूप, खर्च, कंत्राटदाराचे नाव, कामाचा कालावधी आणि संबंधित अधिकाऱ्यांचा संपर्क क्रमांक नमूद रेल्वेच्या नियमांनुसार, अशा असतो. परंतु, किनवट स्थानकावर असा कोणताही फलक दिसत नाही. त्यामुळे हे काम नेमके कोण करत आहे. या कामात टेक्निक अभियंता दिसत नाही याबाबतही भ्रम निर्माण झाला आहे. या कामात रेतीच्या वापर ना करता दगडाच्या चुरीने काम चालू आहे.नागरिकांनी या कामाच्या दर्जावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले

आहे. याचबरोबर, शिवाजीनगर येथील अंडरब्रिजच्या कामाबाबतही नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत. सिमेंट रस्त्याची निकृष्ट गुणवत्ता आणि उडणारी धूळ यामुळे परिसरातील रहिवासी आणि शालेय विद्यार्थी त्रस्त झाले आहेत. श्वसनाच्या समस्या वाढत असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. रेल्वे अधिकारी दौऱ्यावर येतात तेव्हा त्यांना फक्त व्यवस्थित दाखवलेली बाजू दिसते. प्रत्यक्षात प्रवाशांना कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते, हे जाणून घेण्यासाठी अधिकाऱ्यांनी थेट नागरिकांशी संवाद साधणे गरजेचे आहे. विकासकामाच्या नावाखाली प्रवाशांच्या सुरक्षेकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे. रस्ता खोदून ठेवून तो तसेच सोडल्याने रोजच अपघाताचा धोका निर्माण होत आहे. या सर्व प्रकाराकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. अनेकांनी निवेदने दिली, आंदोलनाचे इशारे दिले, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.



# बीड जिल्हयातुन १५९९ प्रकरणे राष्ट्रीय लोकअदालतमध्ये निकाली

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ९ मे २०२६ रोजी बीड मुख्यालयात राष्ट्रीय लोकन्यायालयाचे उद्घाटन आनंद एल.यावलकर, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या हस्ते संपन्न झाले. सदर उदघाटन कार्यक्रमास जिल्हा न्यायाधीश-१ व्ही.एच.पाटवदकर, जिल्हा न्यायाधीश-२ एस.आर.शिंदे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२ आर.एम नेरलीकर मुख्य न्यायदंडाधिकारी पी.आर.शिंदे व इतर न्यायिक अधिकारी तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डॉ.वहाब ए.सय्यद, बीड मुख्यालयातील सर्व न्यायिक अधिकारी, बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष एस.जी.पिसुरे, उपाध्यक्ष आर.व्ही.देशमुख, सचिव सुभाष काळे तसेच त्यांचे सर्व पदाधिकारी, विधिज्ञ सदर उदघाटन कार्यक्रमास उपस्थित होते.महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशावरूनआनंद एल. यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. ९ मे २०२६ रोजी पार पडलेल्या लोक न्यायालयात बीड जिल्हयातुन एकूण. १२०९ प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली आहेत.

बीड जिल्हयातून न्यायालयातील प्रलंबीत प्रकरणांपैकी एकूण ११३५३ प्रकरणे ठेवण्यात आली होती. यामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात, भुसंपादनाची प्रकरणे, १३८ एन.आय.ॲक्टच्या प्रकरणांचा समावेश होता. त्यापैकी ३७१ प्रकरणे निकाली निघाली आहेत. दाखलपुर्व प्रकरणामध्ये एकूण २१११५ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ८३८ प्रकरणे निकाली निघाली आहेत. तसेच स्पेशल डाईव्हचे एकूण प्रलंबीत प्रकरणापैकी ३९० प्रकरणे निकाली निघाली आहेत.



असे एकूण १५९९ प्रकरणे निकाली निघाली आहेत. यामध्ये ७ कोटी ४२ लाख ५९ हजार ३३९ एवढ्या रकमेची प्रकरणे निकाली निघाली आहेत.

बीड मुख्यालयातून कौटुंबिक न्यायालयातील एकूण ५ प्रकरणे निकाली निघाली असून यामध्ये पाच महिला सासरी नांदावयास जाणेची प्रकरणे यशस्वी झाली आहेत. तसेच मोटार अपघात प्रकरणात एका प्रकरणामध्ये ४ कोटी ४८ लाख ९० ची प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली.

सदरील लोक न्यायालयाच्या यशस्वीतेसाठी डॉ.वहाब ए.सय्यद, सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्यासह बीड मुख्यालयातील सर्व न्यायिक अधिकारी, बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व सर्व पदाधिकारी तसेच वकील संघाचे सर्व सदस्य, जिल्हा सरकारी वकील व सर्व सरकारी अभियोक्ता तसेच जिल्हा न्यायालयाचे प्रबंधक एस.पी.झेंड, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधिक्षक एस.टी.शिंदे व इतर सर्व न्यायालयीन कर्मचारी वर्ग यांची लोकन्यायालयात प्रमुख उपस्थिती होती.

न्यायालयीन कर्मचारी, बँक कर्मचारी, पोलीस कर्मचारी व इतर कार्यालयीन कर्मचारी यांनी लोकअदालत यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार करिअरची निवड होणे आवश्यक-प्रो.डॉ.सतीश दांडगे

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना समजून घेऊन पालक व शिक्षकांनी त्यांच्या करिअरबाबत योग्य मार्गदर्शन करण्याची आज मोठी गरज आहे. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये वेगळी क्षमता असते, ती ओळखून त्याला योग्य क्षेत्राची निवड करून देणे महत्त्वाचे आहे. पालकांनी मुलांवर केवळ अपेक्षांचे ओझे न टाकता त्यांच्या आवडीनुसार त्यांना प्रोत्साहन दिल्यास ते जीवनात निश्चितच मोठे यश संपादन करू शकतात, असे प्रतिपादन प्रो.डॉ.सतीश दांडगे यांनी केले.देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल व तुलसी कला, विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय यांच्या वतीने दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा तुलसी समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, प्रा. संजय खाडे, प्राचार्या उमा जगतकर, प्राचार्य प्रा. प्रकाश ढोकणे आदी मान्यवर उपस्थित होते.



प्रा. प्रदीप रोडे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, क्षेत्र कोणतेही असो, त्या क्षेत्रातील सर्वोच्च यश संपादन करण्याचे ध्येय विद्यार्थ्यांनी ठेवले पाहिजे. मोबाईल व वेळेचा सदुपयोग करून मेहनत, वाचन आणि कौशल्य विकासावर भर दिल्यास यश निश्चित मिळते, असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी स्वयंप्रकाशित होऊन स्वतःचे करिअर स्वतः घडवावे. जगात बदल घडवायचा असेल तर प्रथम स्वतःमध्ये बदल घडवावा लागतो, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी प्रा. संजय खाडे यांनी विद्यार्थ्यांना बारावीनंतरच्या विविध अभ्यासक्रम, करिअरच्या संधी तसेच JEE आणि NEET सारख्या स्पर्धा परीक्षांविषयी मार्गदर्शन केले. प्राचार्य प्रकाश ढोकणे यांनी महाविद्यालयाच्या उज्वल निकालाचा गौरव केला व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. यानंतर दहावी आणि बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ, तुलसी समूहाचे पुस्तक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सय्यद सिद्धीक यांनी केले. याप्रसंगी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# मोठेवाडीच्या सरिता खेत्री हिचे घवघवीत यश; महात्मा फुले विद्यालयात द्वितीय क्रमांक

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगांव । प्रतिनिधी**

मोठेवाडी परिसरातील महात्मा फुले विद्यालय येथील विद्यार्थिनी कु. सरिता जगन्नाथ खेत्री हिने उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरी करत विद्यालयात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे विद्यालयासह संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




सरिता हिने सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर मेहनत आणि जिद्दीच्या बळावर हे यश संपादन केले आहे. शिक्षणाबद्दलची तिची आवड, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा मिळालेला पाठिंबा यामुळे ती हे यश मिळवू शकली. तिच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळाली असून शिक्षण क्षेत्रात प्रगती करण्याची नवी उमेद निर्माण झाली आहे. विद्यालयातील शिक्षकांनी सरिताचे विशेष कौतुक करत तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. परिश्रम आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर कोणतेही यश मिळवता येते, असे मत शिक्षकांनी व्यक्त केले. गावातील नागरिकांनीही सरिताच्या यशाचा आनंद साजरा करत तिचे अभिनंदन केले.

कु. सरिता जगन्नाथ खेत्री हिच्या या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडली असून मोठेवाडीच्या शैक्षणिक परंपरेला नवी ओळख मिळाली आहे. भविष्यातही तिने असेच यश संपादन करून आपल्या कुटुंबाचे, विद्यालयाचे मुख्यध्यापक मुंडे सर व सर्व शिक्षकानी अभिनंदन केले आणी गावाचे नाव उज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# नियोजित कालावधीत स्व गणना करावी-तहसीलदार अशोक भंडारे

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

देशातील १६ वी राष्ट्रीय जनगणना २०२७ अंतर्गत स्वगणना (डशश्रष एर्पीाशीरींळेप) करण्यासाठी केज तालुक्यातील सर्व कार्यालयीन प्रमुखांनी योग्य ती कार्यवाही करुन नियोजित कालावधीत स्वगणना करावी, असे निर्देश तहसीलदार अशोक भंडारे यांनी दिले .देशातील १६ वी राष्ट्रीय जनगणना अंतर्गत घर यादी व घरगणना हा पहिला टप्पा १ मे पासून सुरू झालेला आहे. सदर जनगणनेत नागरिकांसाठी स्वगणना (Self Enumeration) ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली असून १ ते १५ मे या कालावधीत नागरिकांना स्वतः ही माहिती ऑनलाईन पद्धतीने सादर करता येणार आहे. ही प्रक्रिया सुलभ, वेगवान व वेळेची बचत करणारी असल्याने याबाबत व्यापक जनजागृती करणे अत्यंत आवश्यक आहे. स्वगणना प्रक्रियेसाठी नागरिकांनी https://se.census.gov.in या संकेतस्थळावर जाऊन मोबाईल क्रमांक व OTP द्वारे लॉगिन करावे, आपल्या घराचे अचूक जिओ-लोकेशन नोंदवावे, कुटुंबाशी संबंधित सुमारे ३३ प्रश्नांची अचूक माहिती भरावी,



**प्रभावी जनजागृती करण्याचे आवाहन**

स्वगणना बाबत नागरिकांमध्ये प्रभावी जनजागृती करावी, कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वगणना पूर्ण करण्यास प्रोत्साहित करावे, सूचना फलक, सामाजिक माध्यमे व स्थानिक प्रसारमाध्यमांद्वारे माहिती प्रसारित करावी, आवश्यकतेनुसार नागरिकांना मार्गदर्शन व सहाय्य उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन प्रभारी तहसीलदार अशोक भंडारे यांनी केले आहे.

नोंदणी पूर्ण झाल्यानंतर प्राप्त होणारा ११ अंकी Self Census (SC) क्रमांक सुरक्षित ठेवावा, १५ मेनंतर प्रगणक संबंधित घरांना भेट देतील. त्या वेळी नागरिकांनी केवळ ११ अंकी डउ क्रमांक उपलब्ध करून दिल्यास माहितीची पडताळणी त्वरित होऊन वेळेची बचत होईल. अशी माहिती तहसीलदार यांनी दिली.

# दहावी बोर्ड परीक्षेत ग्रीन व्हॅली इंटरनॅशनल स्कूलचे घवघवीत यश

**दैनिक वादळ वार्ता**
**नायगाव । हनमंत चंदनकर**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परीक्षेत नायगाव खैरगाव येथील ग्रीन व्हॅली इंटरनॅशनल स्कूल ने घवघवीत यश संपादन करीत यशाची परंपरा कायम राखली आहे.

खैरगाव येथील ग्रीन व्हॅली इंटरनॅशनल स्कूलचा याही वर्षी १००% निकाल लागला असून शाळेने उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली असून अनेक विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा जास्त गुण घेत प्राविण्य मिळविले आहे.






शाळेमधून प्रथम शेख शारीया ९७.२०%,द्वितीय पूजा जिरगे ९४.२०% तर तृतीय सोमेश डोईफोडे ९३.६०% गुण प्राप्त करत विशेष प्राविण्य मिळविले आहे. यामुळे गेल्या अनेक वर्षापासून गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणारी ही शाळा विद्यार्थ्यांना घडविण्यात तालुक्यात अग्रस्थानी असल्याचे स्पष्ट होत आहे. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन नियोजनबद्ध परीक्षेची पूर्वतयारी प्रत्येक विद्यार्थ्यावर विशेष लक्ष यामुळे या शाळेची शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यास मदत होत आहे. शिक्षकांचे परिश्रम विद्यार्थ्यांनी घेतलेली मेहनत व पालकांच्या दक्षतेमुळे या शाळेने यशाची उंची गाठली आहे.या यशाबद्दल शाळेचे व विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचे पालकांचे संस्थेचे सचिव मा.श्री.मुकुंदकांत पटेल साहेब प्राचार्या सरोज धरणे मॅडम तसेच सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# ५९ लाखांच्या दरोडा प्रकरणात फिर्यादीच्या सतर्कतेमुळे दोन आरोपींची जामीन टळली

## 'डिफॉल्ट बेल'वर दोन सराईत सुटले; मात्र ॲड.एल.आर.कर्डिले यांच्या हस्तक्षेपामुळे उर्वरित आरोपी अद्याप कोठडीत

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगांव । प्रतिनिधी**

तालखेडफाटा येथे झालेल्या ५९ लाख ३३ हजार ८५० रुपयांच्या सशस्त्र दरोडा प्रकरणात फिर्यादीच्या सतर्कतेमुळे दोन आरोपींची जामीन प्रक्रिया तात्पुरती थांबली असून ते अद्याप न्यायालयीन कोठडीत आहेत. या प्रकरणात FIR क्र. ३०/२०२६ अंतर्गत इछड कलम ३१०(२), ३०९(४), १२६(२), महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ तसेच आर्म क्ट २५ व ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या गुन्ह्याचा तपास सुरुवातीला पोलीस निरीक्षक गोविंद शामराव पांडव यांच्याकडे होता. त्यानंतर त्यांची बदली झाल्याने तपास दुसऱ्या अधिकाऱ्याकडे वर्ग करण्यात आला. आरोपींना दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी रिमांड देण्यात आली होती. मात्र दि. ३० एप्रिल २०२६ पर्यंत म्हणजेच नियमानुसार ९० दिवसांच्या आत दोषारोपपत्र दाखल करण्यात आले नाही.

त्यामुळे BNSS कलम १८७(३) नुसार दोन सराईत आरोपींना दि. ५ मे २०२६ रोजी 'डिफॉल्ट बेल' मंजूर करण्यात आला. विशेष म्हणजे, या बेल अर्जावर तपासी अधिकाऱ्यांकडून ठोस म्हणणे सादर करण्यात आले नाही, तर सरकारी वकिलांनीही योग्य तो आदेश करावा एवढेच न्यायालयासमोर नमूद केले. न्यायालयाच्या सह-अधीक्षकांचा अहवाल दि. ५ मे रोजी सकाळी ११:५५ वाजता प्राप्त झाल्यानंतर त्याच दिवशी घाईघाईत दोषारोपपत्र दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रकरणात पोलिसांनी केवळ १८० ग्रॅम सोने जप्त केले असून लाखो रुपयांचा उर्वरित मुद्देमाल अद्यापही हस्तगत झालेला नाही.दरम्यान, अटकेत असलेल्या उर्वरित दोन आरोपींनी दि. ७ व ८ मे २०२६ रोजी नियमित जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. यावेळी तपासी अधिकारी आणि सरकारी वकील यांनी न्यायालयात म्हणणे सादर केले होते. युक्तिवाद पूर्ण होऊन आदेश होण्याची शक्यता असतानाच फिर्यादी अमोल पंढरीनाथ गायके यांनी तत्काळ हालचाल करत ॲड.एल. आर. कर्डिले यांची सरकारी पक्षाला सहाय्य करण्यासाठी नियुक्ती केली.ॲड. कर्डिले यांनी न्यायालयात हजर राहून फिर्यादीचे स्वतंत्र म्हणणे दाखल करण्यासाठी वेळ मागितला. त्यानुसार न्यायालयाने पुढील सुनावणीची तारीख दि. ११ मे २०२६ निश्चित केली असून, तोपर्यंत संबंधित आरोपींची जामीन प्रक्रिया स्थगित झाली आहे. दरम्यान, पोलिसांच्या दिरंगाईमुळे दोन सराईत आरोपींना डिफॉल्ट बेल मिळाल्याने व्यापारी वर्गातून नाराजी व्यक्त होत असून, संबंधित तपासी अधिकारी व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077